**प्रेसनोट**

**पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील ०३ संघटीत गुन्हेगारी टोळ्यांवर मोका ( महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ ) अंतर्गत कारवाई केले बाबत.**

श्री. वैभव शिनगारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चाकण पोलीस ठाणे, यांनी श्री. मंचक इप्पर, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१ यांचे मार्फतीने चाकण पोलीस ठाणे, गुन्हा. रजि. नं. १६७८/२०२२ भादंवि कलम ३०७, ४५२, ३२४, ५०६ ४२७, ३४ आर्म अॅक्ट ४(२५), महा.पो.का. कलम ३७ (१) १३५ सह, क्रि.लॉ.अ‍ॅ.अ‍ॅक्ट कलम ३ व ७ चे तपासामध्ये आरोपी नामे, **(१)** सत्यम ऊर्फ पप्पू दतात्रय कड, वय-२२ वर्षे, रा. बापदेव वस्ती, कडाची वाडी, चाकण, ता. खेड, जि. पुणे, **(टोळी प्रमुख) व इतर ०२** यांचेविरूध्द **खून, खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, दुखापत, गर्दी मारामारी, खंडणीसाठी अपहरण, खंडणी मागणे, बेकायदेशीर जमाव जमवून अपक्रिया करणे, शासकीय मालमत्तेचे नुकसान, शासकीय कर्मचा-यांवर हल्ला असे एकुण ११ गुन्हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयचे हद्दित दाखल असल्याने**

श्री. गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तळेगांव दाभाडे पोलीस ठाणे, यांनी डॉ. काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२ यांचे मार्फतीने तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे गु.र.नं. ४००/२०२२ भा.दं.वि.कलम ३०७, ३२४, १४३, १४४, १४७, १४८, १४९ आर्म अॅक्ट.क. ४(२५) महा.पो.अधि.कलम ३७(१) सह १३५ चे तपासामध्ये आरोपी नामे, **(१)** कुणाल ऊर्फ बाबा धीरज ठाकुर, वय-२२ वर्षे, रा. भुजबळ हॉलचे समोर, गणपती चौक, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे, **(टोळी प्रमुख) व इतर १३** यांचेविरूध्द **खुनाचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत, दुखापत, सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न करणे, मृत्यु किंवा जबर दुखापत करणेची भिती दाखवुन बलादग्रहण करणे, बेकायदेशीर जमाव जमवुन लोकांचे जिवीतास धोका निर्माण करणे, तसेच बेकायदेशीर हत्यार जवळ बाळगणे असे एकुण ०७ गुन्हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयचे हद्दित दाखल असल्याने**

श्री. गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तळेगांव दाभाडे पोलीस ठाणे, यांनी डॉ. काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२ यांचे मार्फतीने तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे गु.र.नं. २७२/२०२२ भादवि कलम ३०७, ३५३, ५०४, ५०६, ३४ आर्म अॅक्ट.क. ४(२५) महा.पो.कायदा कलम ३७(१) सह १३५ चे तपासामध्ये आरोपी नामे, **(१)** करणसिंग रजपुतसिंग दुधाणी, वय-२५ वर्षे रा. अंध शाळेचे पाठिमागे, रामटेकडी हडपसर पुणे **(टोळी प्रमुख) व इतर ०१** यांचेविरूध्द **खुनाचा प्रयत्न करणे, सरकारी कामाम अडथळा करुन जिवघेणा हल्ला करणे, दरोड्याची तयारी करणे, चोरी, दिवसाची घरफोडी चोरी, रात्रीची घरफोडी चोरी व बेकायदेशीर अग्निशस्त्र जवळ बाळगणे असे एकुण ०८ गुन्हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयचे हद्दित दाखल असल्याने**

तसेच वरील सर्व आरोपी यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी बनवून हिंसाचाराचा वापर करून वर्चस्वासाठी व आर्थिक फायद्यासाठी संघटितपणे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरूध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अंतर्गत कारवाई करणे बाबत प्रस्ताव मा. अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांचेकडे पाठविला होता. श्रीमती. स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) व श्री. पद्माकर घनवट, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. बाळकृष्ण सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड यांनी सदर प्रस्तावा मधील कागदपत्रांची छाननी करून त्रुटींची पूर्तता करून सदरचा प्रस्ताव आदेश पारीत करणे कामी मा. अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचेकडे पाठविला असता दिनांक ०८/१२/२०२२ रोजी डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(४) या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश पारीत केलेले आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, श्री. अंकुश शिंदे, अपर पोलीस आयुक्त, डॉ. संजय शिंदे, श्रीमती स्वप्ना गोरे. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे), डॉ. काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२, श्री. विवेक पाटील, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१, श्री. पद्‌माकर घनवट, सहायक पोलीस आयुक्त,गुन्हे-१, यांचे मार्गदर्शनाखाली, श्री. बाळकृष्ण सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा, श्री. गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तळेगांव दाभाडे पोलीस ठाणे, श्री. वैभव शिनगारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चाकण पोलीस ठाणे, तसेच अंमलदार पोलीस हवालदार सचिन चव्हाण, पो.ना. व्यंकट कारभारी, पी.सी.बी. गुन्हे शाखा, पो.ना. बर्डे, पो.शि.गुंजाळ, चाकण पोलीस ठाणे, पो.शि. विकास तारू, तळेगांव दाभाडे पोलीस ठाणे, यांचे पथकाने केली आहे.

**टिप :- सन २०२२ मध्ये आजपावेतो १८ गुन्ह्यांत १२९ आरोपींवर मोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.**

**(बाळकृष्ण सावंत)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
पी.सी.बी. गुन्हे शाखा,
पिंपरी चिंचवड.